दिव्य मराठी बीड जिल्हा 26-08-2023

# योगेश्वरीचे विद्यार्थी करणार सायबर सुरक्षेविषयी जागृती

प्रतिनिधी | अंबाजोगाई

योगेश्वरी महाविद्यालय व क्विक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२५ ऑगस्ट रोजी संगणक विभागाच्या विद्यार्थ्यांनी सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अभियाना अंतर्गत प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांची एक दिवसीय कार्यशाळा झाली.

प्रशिक्षित विद्यार्थी समाजातील विविध स्तरावर जाऊन सायबर सुरक्षा विषयी जनजागृती करणार आहेत. निवड झालेली विद्यार्थी क्विक हिल फाउंडेशनच्या वतीने दिल्या जाणाऱ्या कमवा व शिका या योजनेला पात्र ठरतील. क्विक हिल च्या वतीने श्रीमती सुगंधा दाणी व श्री अक्षय नायकू यांनी प्रशिक्षणाची जबाबदारी पार पाडली. मान्यवरांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्हि बी. साखरे, उपप्राचार्य डॉ. आर. व्ही. कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संगणक विभागाचे विभाग प्रमुख प्रा. आर. जी. जोशी, प्रा. ऋतुजा रामदासी, प्रा. आचार्य, प्रा. थेटे, प्रा. एस एस कुलकर्णी, प्रा. गांगणे, शिक्षकेतर कर्मचारी श्री व चौसाळकर श्री खोगरे, सय्यद मशिद्दीन यांनी परिश्रम घेतले. या कार्यशाळेत विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.